# CERTIFICATE.

This is to certify that the dissertation entitled, "Maratha-Nizam Relations In Eighteenth Century", which is being submitted herewith for the award of Degree of MASTER OF PHILOSOPHY IN HISTORY OF SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR is the result of the original research work done by Shri U.N. Jawanjal under my supervision and guidance in the Department of History, Shivaji University, Kolhapur.

(Dr. V. S. Kadam)
Research Guide,
Professor,
Department of History,
Shivaji University,
Kolhapur.

Kolhapur.

Date : 30th November, 1991.

## प्रस्तावना :-

अठराव्या शतकात हिंदुस्थानांत राजकीय घडामोडी घडून आल्या. इंग्रजांचा व फ्रेंचांचा संघर्ष होऊन फ्रेंच नामोहरम झाले व इंग्रजांचा भारतीय राजकारणांत प्रवेश झाला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेले बहादूरशहा, फर्रुकसियर, महमंदशहा दुर्बल असलेने मुघल दरबारांतील अनेक सुभेदार स्वतंत्र्य होऊन त्यांचे तंटे-बखेडे निर्माण झाले. दक्षिण भारतांत मराठे, निजाम, पोर्तुगीज, इंग्रज म्हैसूरचे वोडियार घराणे व त्यानंतर हैदर आणि टिपू यांच्या सत्ता होत्या. आणि त्यांच्यात दक्षिण हिंदुस्थानच्या वर्चस्वा-साठी संघर्ष प्रबल चालले होते. या सर्व सत्तांत मराठे व निजाम या सत्ता प्रबल होत्या.

या प्रबंधात अठराव्या शतकांतील मराठे व निजाम संबंधाचा सलग अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहास संशोधक गोविंद सखाराम सरदेसाई, डॉ.व्ही.जी.दिघे, सेतु माधवराव पगडी यांनीं त्यांच्या ग्रंथांत वेळोवेळी विचार मांडले आहेत. मराठा-निजाम संबंधावर सलगपणे विचार करुन प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांनीं पुणे विद्यापीठांत १९५४ या वर्षी व्याख्यानें दिली व ती पुणे विद्यापीठामार्फत प्रकाशितही झाली आहेत. त्यानंतर या विषयांवर सलगपणे विचार आणि अभ्यास करुन लिखाण करणे हे आवश्यक होते. अप्रकाशित परंतु पेशवे दप्तरांत मिळालेल्या कागदपत्रांच्या आणि पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रसिध्द केलेल्या त्रैमासिकांतील लेखांच्या आधारे अठराव्या शतकां-तील मराठे-निजाम संबंधाचे पुनर्लेखन करण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे. एकूण सहा प्रकरणांत त्याची मांडणी केली आहे.

पहिल्या प्रकरणांत भौगोलिक परिस्थिती, राजकीय इतिहास व साधनांचा आढावा घेतला आहे. दुसऱ्या प्रकरणांत निजामाचा पूर्वइतिहास आणि पेशवा बाजीराव-निजाम यांच्यातील पालखेड, भोपाळ लढाया व बाजीराव-नासिरजंग युध्दाचे वर्णन केले आहे. तिसऱ्या प्रकरणांत पेशवा बाळाजी बाजीराव-निजाम यांच्या कर्नाटक मोहिमा, भालकी तह, शिंदखेड लढा, उदगीर लढाई यांचा आढावा घेतला आहे. चौथ्या प्रकरणांत पेशवा माधवराव-निजाम यांच्यातील भेटक, उरळी, घोडनदी व राक्षसभुवन लढाया आणि जानोजी भोसले-निजाम संघर्ष, माधवराव-निजाम भेट यांचा परामर्श घेतला आहे. पांचव्या प्रकरणांत बारभाई व निजाम, चौकडीचे राजकारण, मराठा-म्हैसूर युध्द, खर्ड्याची लढाई यांचा परामर्श घेतला आहे. सहावे प्रकरण उपसंहाराचे केले आहे.

माझ्या संशोधन कार्यास वेळोवेळी सूचना देऊन उत्तेजकता ठेवून अखंड मार्गदर्शन, मार्गदर्शक प्रोफेसर व्ही.एस.कदम यांचे लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मी हे संशोधन कार्य पूर्ण करु शकलो, तेंव्हा त्यांचा मी सदैव ऋणी आहे. प्रोफेसर कांबळे बी.आर., इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ यांच्या प्रेरणेमुळेच मी संशोधनास प्रवृत्त झालो, तेंव्हा त्यांचाही ऋणी आहे. प्राचार्य सूर्याजीराव परब आणि प्रा. राजा माने, यांनी सुविधा उपलब्ध करुन दिल्यानेच हे संशोधन कार्य पूर्ण झाले, तेंव्हा त्यांचाही ऋणी आहे.

श्री. शिंदे, अभिलेखाधारी, पुणे पुराभिलेख आणि

त्यांचे सहकारी यांच्यामुळे मला पुणे दप्तरांतील अप्रकाशित कागदपत्रे मिळाली, म्हणून त्यांचेहि ऋण मानने कर्तव्य ठरते. श्री. जी. टी. कुलकर्णी, चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांचा ऋणी आहे. श्री. धोंडीराम पोरे यांचाही ऋणी आहे. श्री. विजय पाटील यांनी वेळेत टंकलेखन केले, त्याबद्दल त्यांचाही ऋणी आहे.

शेवटी माझी आई, श्रीमती लक्ष्मीबाई, पत्नी सौ. सुधा, मुले चि. विजय व कु. स्नेहल यांचेहि आभार मानने उचित होईल.

कोल्हापूर.
दिनांक :- ३० नोव्हेंबर, १९९१.

(यू. एन्. जवंजाळ)